स्वामी रामानंद तीर्थ शासकीय ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय, अंबेजोगाई, जि. बीड.

एम.बी.बी.एस. पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता ५० वरुन १०० एवढी वाढ करण्यास परवानगी.

स्वा. रा. ती. ग्रा. वै. महाविद्यालय, अंबाजोगाई आवक क्र. दि. 576 1-6-3

महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग,
गो.ते. रुग्णालयाची नवीन इमारत, ९ वा मजला, गो.ते. रुग्णालय संकुल,
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४०० ००१
शासन निर्णय क्रमांक एमईडी २०१३/प्र.क्र. ३०२/१३/शिक्षण-२
दिनांक:- ०१ ऑगस्ट, २०१३

**वाचा:-** भारतीय आयुर्विज्ञान परिषद, नवी दिल्ली यांचे संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना ई-मेल व्दारे दिनांक ३१.०७.२०१३ रोजी प्राप्त पत्र.

शासन निर्णय:- भारतीय आयुर्विज्ञान परिषदेने उपरोक्त संदर्भाधीन पत्रान्वये दिलेली मान्यता विचारात घेऊन स्वामी रामानंद तीर्थ शासकीय ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय, अंबेजोगाई, जि. बीड या महाविद्यालयातील एम.बी.बी.एस. पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून ५० वरुन १०० एवढी वाढ करण्यास, खालील अटींच्या अधीन राहून शासन याद्वारे मान्यता देत आहे:-

२. अटी:-

१) उक्त पदवी अभ्यासक्रमास महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे संलग्निकरण प्राप्त करुन घेण्यात यावे व तद्नंतर प्रवेश करण्यात यावेत.

२) राज्य शासन / केंद्र शासन / मा.सर्वोच्च न्यायालय अथवा मा. उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरीता कार्यपद्धत अवलंबिण्यात यावी.

३) भारतीय आयुर्विज्ञान परिषदेने संदर्भाधीन पत्रात विहित केलेल्या अथवा त्यांच्याकडून अथवा केंद्र शासनाकडून अथवा राज्य शासनाकडून वेळोवेळी विहित करण्यात येतील अशा सर्व आदेशांचे पालन करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

३. सदर आदेश, भारतीय आयुर्विज्ञान परिषदेने संदर्भाधीन पत्रांन्वये दिलेली मान्यता विचारात घेऊन, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ मधील कलम ६४ (५) नुसार शासनास प्रदत्त असलेल्या अधिकाराचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(स्वप्नील गोपाल बोरसे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.उप मुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई
अधिष्ठाता, स्वामी रामानंद तीर्थ शासकीय ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय, अंबेजोगाई, जि. बीड ४३१ ५१७.
अधिष्ठाता, सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालये
ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ, ग्रंथालय, विधानभवन, मुंबई
कार्यालयीन सचिव, प्रवेश नियंत्रण समिती / शिक्षण शुल्क समिती, २०५, गव्हर्नमेंट पॉलीटेक्नीक बिल्डींग, ४९, खेरवाडी, अली यावर जंग मार्ग, बांद्रा (पू.) मुंबई-५१.
मा.मंत्री (वै.शि.) यांचे स्वीय सहायक
मा.राज्यमंत्री (वै.शि.) यांचे स्वीय सहायक
निवडनस्ती (शिक्षण-२)